# के. के. वाघ महाविद्यालयास 'नॅक'ची 'अ' श्रेणी

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद अर्थात नॅक या केंद्रीय स्तरावरील संस्थेकडून के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय, काकासाहेब नगर (रानवड), ता. निफाड, जि. नाशिक यांस अ श्रेणी दर्जा प्राप्त झालेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अंतर्गत शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता आधारावर अ श्रेणी प्राप्त करणारे कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय हे ग्रामीण भागातील महाविद्यालय ठरले आहे.

शैक्षणिक प्रक्रियेत संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रम अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधन कार्य आणि विद्याशाखा सदस्याचे प्रकाशन, मूलभूत सुविधा आणि संसाधानीची स्थिती, संस्था प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा व सांस्कृतिक वारसा इत्यादींच्या आधारावर महाविद्यालयास मूल्यमापन प्राप्त झालेले आहे.



ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब देवराम वाघ यांनी ग्रामीण भागात महाविद्यालये सुरू केली. याच हेतूने ग्रामीण भागाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरदेखील भर दिला जात असतो. संस्थेच्या ५३ वर्षांच्या देदिप्यमान कारकिर्दीत के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय, काकासाहेबनगर (रानवड) या महाविद्यालयास नॅकद्वारे मिळालेले मानांकन आश्वासक आणि सुखावह टप्पा आहे.
– **समीर बाळासाहेब वाघ,** अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सर्व विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव यांनी शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव, उपप्राचार्य डॉ. अतुल गवारे, प्रा. किरण वाघ, नॅक समन्वयक प्रा. शीतल जगताप, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. मिलिंद पवार यांनी सहकार्य केले.